I J R S S I S, Spl Issue (III), July-2020 : 41-46
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# कोविड-19 दरम्यान ग्रामिण व शहरी बी.एड छात्राध्यापकांमध्ये वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव- तुलनात्मक अभ्यास

उज्वला स. नवले
मारीया अध्यापक महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर, महाराष्ट्र
*Corresponding Author: usnavale@gmail.com

**सारांश:**

कोविड - 19 या आजाराने पूर्ण विश्वात थैमान घातले आहे. यावर मानवाला मात करायची असेल तर वैयक्तिक स्वच्छता राखणे गरजेचे आहे. वैयक्तिक स्वच्छता आपल्या सभोवतालच्या व्यक्तिंना दुर्बल वैयक्तिक सवयींमुळे उद्धवणाÚया आजारांपासून वाचवते. प्रत्येक शिक्षित व्यक्तिने समाजातील इतर घटकांना यासंदर्भात मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. भावी शिक्षकांना अशा महामारीच्या परिस्थितीत वैयक्तिक स्वच्छता कशी ठेवायची त्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. कारण सक्षम समाज निर्माण करण्याचे काम शिक्षकांचेच आहे. या कारणाने संशोधिकेला कोविड-19 दरम्यान ग्रामिण व शहरी बी.एड छात्राध्यापकांमधील वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव याचा तुलनात्मक अभ्यास करणे आवश्यक वाटले. यात चंद्रपूर शहरातील मारीया अध्यापक महाविद्यालयातील एकुण 80 छात्राध्यापकांची असंभाव्यतेच्या आधारे सहेतूक नमूना निवड करण्यात आली. यात 40 छात्राध्यापक (20 ग्रामिण, 20 शहरी) व 40 छात्राध्यापिका (20 ग्रामिण, 20 शहरी) यांचा समावेश करण्यात आला

कोविड -19 दरम्यान ग्रामिण व शहरी छात्राध्यापकांची वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव अभ्यासण्यासाठी स्वनिर्मित चाचणी गुगल फाॅर्म व्दारे तयार केली. यात जागतिक आरोग्य संघटनेच्या नियमावलीनुसार एकूण 14 विधाने तयार करून त्यांचा समावेश करण्यात आला. व ती चाचणी छात्राध्यापकांना आॅनलाईन सोडविण्यास देण्यात आली. आलेल्या प्रतिचारांचे संकलन करून विश्लेषण करण्यात आले. तुलनात्मक अभ्यासासाठी ष्जष् परिक्षण करण्यात आले. विश्लेषणावरून असे आढळून आले की,

छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांतील ष्जष् मूल्य 1.48 असून ते 0.01 आणि 0.05 स्तरावर सार्थक नाही म्हणजेच छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांमधील वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव हा सारखाच आहे.

ग्रामिण व शहरी छात्राध्यापकांमधील तुलना केली असता ष्जष् मूल्य 2.36 प्राप्त झाले. हे मूल्य 0.05 स्तरावर सार्थक आहे. म्हणजेच शहरी भागातील छात्राध्यापकांची वैयक्तिक स्वच्छता ही ग्रामिण छात्राध्यापकांपेक्षा जास्त आहे.ग्रामिण व शहरी छात्राध्यापिकांची वैयक्तिक स्वच्छतेची तुलना केली असता ष्जष् मूल्य 5.50 आढळून आले. हे 0.01 व 0.05 दोन्ही स्तरावर सार्थक आहे. ग्रामिण छात्राध्यापिकांची वैयक्तिक स्वच्छता ही शहरी छात्राध्यापिकांपेक्षा जास्त आहे.

कोविड-19 दरम्यान वैयक्तिक स्वच्छतेच्या प्रभावाचा अभ्यास करण्यासाठी केलेल्या संशोधनात ग्रामिण व शहरी भागातील छात्राध्यापकांवर योग्य असा प्रभाव आढळून आला व भावी शिक्षक या नात्याने त्यांच्यात जागरूकता दिसून आली.

**Key words: -** कोविड-19, वैयक्तिक स्वच्छता, ग्रामिण व शहरी छात्राध्यापक , प्रभाव.

**प्रस्तावना:**

सध्याच्या काळात कोरोनाच्या रूपात संपूर्ण जगापुढे वैश्विक महामारीचे भयंकर संकट उभे आहे. भारतातही त्या महामारीने आगमन केले असून, आपले रौद्र रूप दाखवायला सुरूवात केली आहे. आणि संपूर्ण मानवजाती समोर एक आव्हान उभे केले आहे. शासन, प्रशासन आणि लोकजीवन यांच्या एकत्रित प्रयत्नातून आपण समर्थपणे ते आव्हान पेलीत आहोत. संपूर्ण जग या महामारीशी लढण्याचा प्रयत्न करीत आहेत. कोवीड-19 या आजाराशी लढण्याकरिता आपली रोगप्रतिकार शक्ती ही चांगली असायला

पाहिजे. त्याकरीता पोषक आहार, व्यायाम व वैयक्तिक स्वच्छता या गोष्टी महत्वाच्या आहेत.

**कोविड-19 दरम्यान घ्यावयाची वैयक्तिक स्वच्छताः**

कोरोना विषाणूचा संसर्ग होउु नये म्हणून जागतिक आरोग्य संघटनेने नव्या मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. यात वैयक्तिक स्वच्छतेवर जास्त भर दिलेला आहे. या सूचनांचे पालन केल्यास कोरोना विषाणूचा प्रार्दूभाव अंशतः कमी करता येतो.

1. कोविड-19 दरम्यान सार्वजनिक ठिकाणी खोकतांना किंवा शिंकतांना आपले तोंड आणि नाक आपल्या कोपर किंवा टिशू पेपरने झाकावा.

2. वापरलेला टिशू पेपर त्वरीत बंद कचरापेटी मध्ये टाकावा.

3. सार्वजनिक ठिकाणी खोकला किंवा शिंका येत असल्यास लोकांपासून कमीत कमी 3 फूट

अंतर ठेवावे.

4. सार्वजनिक ठिकाणी जातांना मास्कचा वापर करावा.

5. गर्दीच्या ठिकाणी गेल्यानंतर घरी आल्यावर कमीत कमी 20-30 सेकंद साबण आणि पाण्याने

हात धुवावे.

6. 70टक्के अल्कोहोल मिश्रीत सेनिटासझर चा उपयोग हात स्वच्छ करण्यास करावा.

7. वारंवार डोळे, नाक आणि तोंडाला स्पर्श करणे टाळावे. इ. वैयक्तिक स्वच्छतेबाबत नियम

पाळणे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे.

समाजामध्ये वरील सर्व सूचनांचे पालन होण्यासाठी समाजातील घटक हा शिक्षित असणे गरजेचे आहे. प्रत्येक नागरीकाला कोविड-19 दरम्यान स्वतःची स्वच्छता राखून कोरोना विषाणूंचा संसर्ग होउु नये यासाठी खबरदारी घेणे गरजेचे आहे. व हे प्रत्येक शिक्षित व्यक्तिने समाजातील इतर घटकांना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापक हे भावी शिक्षक आहेत. 21 व्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम समाज निर्माण करण्याचे काम शिक्षकांचेच आहे.. त्यासाठी भावी शिक्षकांना अशा महामारीच्या परिस्थितीत वैयक्तिक स्वच्छता कशी ठेवायची त्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. समाजातील इतर घटकांना मार्गदर्शन करणे व या कोविड-19 महामारीच्या काळात समाजाला योगदान देण्याचे काम भावी शिक्षकांचे आहे. अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षण घेणारे छात्राध्यापक हे शहरी व ग्रामिण भागातले असतात. प्रत्येक छात्राध्यापकांमधील सामाजिक, शैक्षणिक, व नैतिक घटक हे भिन्न असतात. भावी शिक्षक हा समाजाचा आधार स्तंभ आहे. कोरोना नामक या महामारीला समोरे जाण्यासाठी भावी शिक्षकांना स्वतः जागरूक राहणे आवश्यक आहे. त्यांच्यामध्ये वैयक्तिक स्वच्छताबद्दल जाणीव आहे की नाही ? व त्याचा प्रभाव भावी शिक्षकांवर किती प्रमाणात आहे?. याचा अभ्यास म्हणून संशोधिकेने सदर समस्या संशोधनासाठी निवडली आहे.

**संशोधनाची गरज आणि महत्वः**

भारतासारख्या देशात जेथे एकूण लोकसंख्येसाठी असलेली वैद्यकीय सुविधांची स्थिती, वैद्यकीय, आहार, स्वच्छतेविषयी जागरूकता इ. पाहता कठोर उपाययोजनाची गरज आहे. जे की आपण आता बघतो व करतो आहोत. कोविड-19 च्या दरम्यान विषाणूंचा प्रादूर्भाव कमी करण्यासाठी सर्वात मोठे योगदान वैयक्तिक स्वच्छतेचे आहे. जागतिक आरोग्य संघटनेने वैयक्तिक स्वच्छता राखण्यास प्रत्येक नागरीकांना आव्हान केले आहे. व तशा सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहे. परंतु त्या सुविधा उपाययोजना अमलात आणने महत्वाचे आहे. प्रत्येक व्यक्ती स्वतःची स्वच्छता कोवीड-19 च्या स्वच्छतेच्या नियमानुसार करीत आहेत काय ? त्यांना वैयक्तिक स्वच्छतेबद्दल जाणीव आहे काय ? प्रत्येक व्यक्तित वैयक्तिक

स्वच्छतेबद्दल असलेल्या जाणीवेचा प्रभाव आहे काय ? या सर्वांचे उत्तर जाणून घेणे गरजेचे आहे. देशातील प्रत्येक नागरीकाने वैयक्तिक स्वच्छतेचे नियम पाळले तर कोविड-19 विषाणूचा पूर्णपणे नायनाट करणे सोपे होईल.

भावी शिक्षकांना विद्याथ्र्यांना घडवायचे आहे. त्यामुळे भावी शिक्षकाला देशाच्या कोविड-19 सारख्या प्रत्येक संकटाला सामोरे जावून आदर्श घडवायचा आहे. त्यासाठी भावी शिक्षक स्वतः जागृत असणे गरजेचे आहे. म्हणून त्यांच्यातील वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव जाणून घेण्याची आवश्यकता आहे. कोविड-19 दरम्यान ग्रामीण भाग असो की शहरी भाग असो. प्रत्येक नागरीकांना वैयक्तिक स्वच्छता पाळणे गरजेचे आहे. यासाठी त्यासंदर्भातील ज्ञान असणे महत्वाचे आहे. व त्यासंदर्भात मार्गदर्शन करणे व नागरीकांना जागृत करणे साहजीकच भावी शिक्षकांवर अवलंबून आहे. अध्यापक महाविद्यालयामध्ये ग्रामीण व शहरी भागातील छात्राध्यापक प्रशिक्षणासाठी येत असतात. प्रत्येक छात्राध्यापकांच्या वैयक्तिक स्वच्छतेबद्दलच्या सवयी ह्या वेगवेगळया असतात. या कोविड-19 दरम्यान त्यांच्या वैयक्तिक स्वच्छतेच्या सवयींचा प्रभाव कसा आहे ? त्याबद्दल जाणिव जागृती किती झाली आहे? कोविड- 19 दरम्यान वैयक्तिक स्वच्छतेबद्दल गंभीर आहेत किंवा नाही? त्यांना स्वच्छतेबद्दल औपचारिक शिकृषण घेण्याची गरज वाटते की नाही? या सर्व प्रश्नांचा तुलनात्मक अभ्यास करण्याची गरज संशोधिकेला वाटली म्हणून ही समस्या संशोधन करण्यासाठी संशोधिकेने निवडली.

**समस्या विधानः**

"कोविड-19 दरम्यान ग्रामिण व शहरी बी.एड छात्राध्यापकांमध्ये वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव - तुलनात्मक अभ्यास "

**संशोधनाची उद्दिष्टेः**

1. कोविड -19 दरम्यान अध्यापक महाविद्यालयातील ग्रामिण व शहरी छात्राध्यापक व छात्राध्यापिकांच्या वैयक्तिक स्वच्छतेच्या प्रभावाचा अभ्यास करणे.

2. अध्यापक महाविद्यालयातील ग्रामिण व शहरी छात्राध्यापक व छात्राध्यापिकांमधील वैयक्तिक स्वच्छतेच्या प्रभावाची तुलना करणे.

3. अध्यापक महाविद्यालयातील ग्रामिण व शहरी छात्राध्यापकांच्या वैयक्तिक स्वच्छतेच्या प्रभावाची तुलना करणे.

4. अध्यापक महाविद्यालयातील ग्रामिण व शहरी छात्राध्यापिकांच्या वैयक्तिक स्वच्छतेच्या प्रभावाची तुलना करणे.

**संशोधनाच्या परिकल्पना (शून्य परिकल्पना)०:**

1. अध्यापक महाविद्यालयातील ग्रामिण व शहरी छात्राध्यापक व छात्राध्यापिकांमधील वैयक्तिक स्वच्छतेच्या प्रभावातील फरक सार्थक नाही.

2. अध्यापक महाविद्यालयातील ग्रामिण व शहरी छात्राध्यापकांच्या वैयक्तिक स्वच्छतेच्या प्रभावातील फरक सार्थक नाही.

3. अध्यापक महाविद्यालयातील ग्रामिण व शहरी छात्राध्यापिकांच्या वैयक्तिक स्वच्छतेच्या प्रभावातील फरक सार्थक नाही.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादाः**

प्रस्तुत संशोधन हे चंद्रपूर जिल्ह्यातील अध्यापक महाविद्यालयातील ग्रामिण व शहरी छात्राध्यापक व छात्राध्यापिका मधील कोविड-19 दरम्यान असणा-या वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव या घटकांपुरतेच मर्यादित आहे.

**न्यादर्शः**

प्रस्तुत संशोधनासाठी चंद्रपूर जिल्हयातील विविध अध्यापक महाविद्यालयापैकी मारीया अध्यापक महाविद्यालयातील 80 ग्रामिण व शहरी प्रशिक्षणार्थी छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांची

असंभाव्यता पद्धतीतील सप्रयोजन पद्धतीनुसार न्यादर्श म्हणून निवड केली.

**संशोधन पद्धतीः**

प्रस्तुत संशोधनाच्या विषयाचे स्वरूप लक्षात घेता सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. या संशोधन पद्धतीचा वापर करताना छात्राध्यापकांची कोविड-19 दरम्यान वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव कळावा म्हणून चाचणी च्या आधारे मापन करून एकूण वर्तमानस्थिती स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधनाची साधनेः**

शैक्षणिक संशोधनामध्ये विश्वासार्ह, वैध, गुणात्मक व परिमाणात्मक संशोधन आधार सामुग्रीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन करून संशोधनाचे निष्कर्ष काढावे लागतात. संशोधनाचे निष्कर्ष अचूक यावेत म्हणून साधनांची निवड करताना संशोधिकेने स्वःनिर्मित प्रश्नावली गुगल फॉर्म च्या साहायाने तयार केली. यात पद्धिश्रयन श्रेणी प्रकारचा उपयोग करण्यात आला. या चाचणीमध्ये जागतिक आरोग्य संघटनेने कोविड-19 दरम्यान वैयक्तिक स्वच्छता कशी राखायची या संदर्भातील दिलेल्या सूचनांनुसार चाचणीत एकूण 14 विधानांचा समावेश करण्यात आलेला आहे. चाचणीची विश्वसनीयता चाचणी-पूर्णचाचणी पद्धतीव्दारे तपासण्यात आली.

**सांख्यिकीय साधनेः**

न्यादर्शातील अध्यापक महाविद्यालयातील ग्रामिण व शहरी छात्राध्यापकांकडून प्राप्त झालेल्या आधारभूत माहितीच्या विश्लेषणाकरिता मध्यमान, प्रमाण विचलन, ज.अंसनम या संख्याशास्त्रीय परिमाणांचा उपयोग करण्यात आला.

**ग्रामिण व शहरी छात्राध्यापक व छात्राध्यापिकांच्या वैयक्तिक स्वच्छतेच्या प्रभावाच्या माहितीचे विश्लेषण**

विश्लेषण: वरील सारणी मध्ये छात्राध्यापक व छात्राध्यापिकांची कोविड-19 दरम्यान वैयक्तिक स्वच्छता या चाचणी व्दारे मिळालेले प्राप्तांक दर्शविलेले आहेत. प्रतिचारांचे विश्लेषण केले असता ग्रामिण व शहरी छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांची वैयक्तिक स्वच्छता या प्राप्तांकाचे मध्यमान अनुक्रमे 63.85, 65.60, 67.55, 63.70 आहेत. कोविड-19 दरम्यान शहरी भागातील छात्राध्यापकांमधील वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव हा ग्रामिण भागातील छात्राध्यापकांपेक्षा जास्त आढळून आला. ग्रामिण भागातील छात्राध्यापिकांमधील वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव हा शहरी भागातील छात्राध्यापिकांपेक्षा जास्त आढळून आला.

**अध्यापक महाविद्यालयातील ग्रामिण व शहरी छात्राध्यापक व छात्राध्यापिकांमधील वैयक्तिक स्वच्छतेच्या प्रभावाची मध्यमानाच्या आधारे सार्थकतेची तुलना**

**विश्लेषण:** अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांमधील वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव यातील फरक अभ्यासण्याकरिता ष्जष् मूल्ये काढण्यात आले. उपरोक्त सारणीवरून प्राप्त ष्ज' मूल्य 1.48 आढळले. ष्ज' मूल्याची सार्थकता 0.01 स्तराकरीता 2.71 तर 0.05 स्तरावर 2.02 आवश्यक आहे. प्राप्त मूल्य 1.48 हे 38 क िसाठी 0.01 आणि 0.05 या स्तरावर आवश्यक मूल्यापेक्षा कमी असल्यामुळे हा फरक 0.01 आणि 0.05 स्तरावर सार्थक नाही म्हणून परिकल्पना क्रमांक 01 चा स्वीकार करण्यात आला.

**अध्यापक महाविद्यालयातील ग्रामिण व शहरी छात्राध्यापकांच्या वैयक्तिक स्वच्छतेच्या प्रभावाची मध्यमानाच्या आधारे सार्थकतेची तुलना.**

**विश्लेषण:** अध्यापक महाविद्यालयातील ग्रामिण व शहरी छात्राध्यापकांच्या वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव यातील फरक अभ्यासण्याकरिता ष्ज' मूल्ये काढण्यात आले. उपरोक्त सारणीवरून प्राप्त ष्ज' मूल्य 2.36 आढळले. ष्ज' मूल्याची सार्थकता 0.01 स्तराकरीता 2.88 तर 0.05 स्तरावर 2.10 आवश्यक आहे. प्राप्त

मूल्य 2.36 हे 18 क िसाठी 0.01 या स्तरावर आवश्यक मूल्यापेक्षा कमी आहे. तर 0.05 या स्तरावर आवश्यक मूल्यापेक्षा जास्त असल्यामुळे हा फरक 0.05 स्तरावर सार्थक आहे. म्हणून परिकल्पना क्रमांक 02 चा त्याग करण्यात आला.

**अध्यापक महाविद्यालयातील ग्रामिण व शहरी छात्राध्यापिकांच्या वैयक्तिक स्वच्छतेच्या प्रभावाची मध्यमानाच्या आधारे सार्थकतेची तुलना.**

**विश्लेषण:** अध्यापक महाविद्यालयातील ग्रामिण व शहरी छात्राध्यापिकांच्या वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव यातील फरक अभ्यासण्याकरिता t मूल्ये काढण्यात आले. उपरोक्त सारणीवरून प्राप्त t मूल्य 5.5 आढळले. t मूल्याची सार्थकता 0.01 स्तराकरीता 2.88 तर 0.05 स्तरावर 2.10 आवश्यक आहे. प्राप्त मूल्य 5.5 हे 18 df साठी 0.01 व 0.05 या स्तरावर आवश्यक मूल्यापेक्षा जासत आहे. हा फरक 0.01 आणि 0.05 स्तरावर सार्थक आहे. म्हणून परिकल्पना क्रमांक 03 चा त्याग करण्यात आला.

**निष्कर्ष:**

**1.** कोविड-19 दरम्यान शहरी भागातील छात्राध्यापकांमधील वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव हा जास्त आढळून आला. तर ग्रामिण भागातील छात्राध्यापकांमधील वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव हा कमी आहे

2. कोविड-19 दरम्यान ग्रामिण भागातील छात्राध्यापिकांमधील वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव हा शहरी भागातील छात्राध्यापिकांपेक्षा जास्त आढळून आला.

3. कोविड-19 दरम्यान अध्यापक महाविद्यालयातील ग्रामिण व शहरी छात्राध्यापक व छात्राध्यापिकांमधील वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव हा जवळपास सारखाच आढळून आला.

4. अध्यापक महाविद्यालयातील शहरी छात्राध्यापकांच्या वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव हा ग्रामिण छात्राध्यापकांच्या वैयक्तिक स्वच्छतेच्या प्रभावापेक्षा जास्त आहे. म्हणजेच शहरी भागातील छात्राध्यापकांमध्ये कोविड-19 दरम्यान वैयक्तिक स्वच्छतेबद्दल प्रभाव जास्त आढळून आला.

5. अध्यापक महाविद्यालयातील ग्रामिण छात्राध्यापिकांच्या कोविड-19 दरम्यान वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव हा जास्त आढळून आला.

6. ग्रामिण छात्राध्यापिकांच्या तुलनेत शहरी छात्राध्यापिकांच्या वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव हा कमी प्रमाणात आहे.

7.ग्रामिण व शहरी भागातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांमध्ये कोविड-19 चे गांभिर्य असून तेदेखील वैयक्तिक स्वच्छतेबद्दल जागृत आहेत. व भावी शिक्षक या नात्याने इतरांना प्रोत्साहित करण्यास तयार आहेत असे संकलित माहितीच्या आधारे आढळून आले.

**शिफारशी:**

**1.** महाविद्यालयामध्ये कोविड-19 दरम्यान वैयक्तिक स्वच्छतेबद्दल जाणिव जागृतीसाठी विडीओ काॅन्फरन्स, वेबिनारचे आयोजन करावे, जेणेकरून छात्राध्यापक त्यामध्ये सक्रिय सहभाग घेतील.

2. सद्य:परिस्थित निर्माण होण्या-या समस्या सोडविण्यासाठी युवा पिढींचा सहभाग घेवून त्यांच्या कल्पनांना वाव दयावा .

3. कोविड-19 दरम्यान शासनाच्या उपक्रमात नियमांचे पालन करून शासनाने युवा पिढीला सहभागी करून घ्यावे

4. कोविड-19 दरम्यान जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शनानूसार वैयक्तिक स्वच्छतेबद्दल युवा पिढीने ग्रामिण भागातील नागरीकांना महत्व पटवून दयावे.

**समारोप:**

कोविड-19 साथीच्या आजारामुळे देशासमोर जागतिक आव्हाने उद्धवलेली आहेत. वैयक्तिक स्वच्छता राखूण आपण सुरक्षित जग बनवू शकतो म्हणून कोरोना विषाणूचा शरीरामध्ये शिरकाव

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

रोखण्यासाठी वैयक्तिक स्वच्छता राखणे महत्वाचे आहे. यात जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या मार्गदर्शनाचे पालन करणे गरजेचे आहे. समाजातील शिक्षित व्यक्तीने या लढाईत मनाने सहभाग घेणे आवश्यक आहे. भावी शिक्षक या नात्याने ग्रामिण व शहरी छात्राध्यापकांची कोविड-19 दरम्यान भूमिका मोठी आहे. म्हणून संशोधनानुसार ग्रामिण व शहरी छात्राध्यापक व छात्राध्यापिकांमधील कोविड-19 दरम्यान वैयक्तिक स्वच्छतेचा प्रभाव हा मोठया प्रमाणावर असलेला आढळून आला. वैयक्तिक स्वच्छते बद्दलचे नियम पाळण्यास ग्रामिण व शहरी भागातील छात्राध्यापक ईच्छूक आहेत.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

आगलावे, प्रदिप ; 2001 संशोधन पद्धती व तंत्रे नागपूर, विद्या प्रकाशन

घोरमोडे, के.यु. ; 2008 शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, पुणे, श्री विद्या प्रकाशन

भितांडे वि.रा. ; 1989 शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे, नूतन प्रकाषन

भांडारकर, के.एम. 1987 सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, नागपूर, महाराष्ट्र[a] ग्रंथ निर्मिती मंडळ

https://www.unicef.org/coronavirus/cleaning-and-hygiene-tips-help-keep-coronavirus-covid-19-out-your-home

https://www.health.gov.au/news/health-alerts/novel-coronavirus-2019/

https://www.who.int/emergencies/diseases/novel-coronavirus-2019/advice for-public

**परिशिष्ट:**

स्वनिर्मित चाचणी गुगल फाॅर्म लिंक:

https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSfAi6GOjz3qwMYrH0P8vHZwwGrx-d3r_tcexZ_YOBOEGBhecg/viewform